महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) मार्च–एप्रिल २०२२ परीक्षेच्या वेळापत्रकातील अंशत: बदलाबाबत

# प्र क ट न

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च– एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा दि. ०४/०३/२०२२ ते दि. ३०/०३/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर परीक्षेचे वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आलेले आहे.

सदर वेळापत्रकानुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेतील अर्धमागधी (१६) या विषयासह अन्य विषयांची परीक्षा दि. ०७.०३.२०२२ रोजी दुपारच्या सत्रात दु. ३.०० ते ६.३० वा. आयोजित करण्यात आलेली आहे. तथापि, सदर विषयांपैकी फक्त अर्धमागधी (१६) या विषयाच्या वेळापत्रकामध्ये अंशत: बदल करण्यात येत असून तो खालीलप्रमाणे आहे.

| यापूर्वी अर्धमागधी (१६) या विषयासाठी वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला तपशिल | | अर्धमागधी (१६) या विषयासाठी वेळापत्रकाबाबत सुधारित तपशिल | |
|---|---|---|---|
| वार व दिनांक, सत्र व वेळ | विषय व विषय सांकेतांक | वार व दिनांक, सत्र व वेळ | विषय व विषय सांकेतांक |
| सोमवार, दि.०७ मार्च, २०२२ दुपार सत्र दु. ३.०० ते ६.३० | अर्धमागधी (१६) | मंगळवार, दि.०८ मार्च, २०२२ दुपार सत्र दु. ३.०० ते ६.३० | अर्धमागधी (१६) |

इ. १२ वी लेखी व अन्य परीक्षेच्या उर्वरित वेळापत्रकामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तरी वेळापत्रकातील उपरोक्त अंशत: बदलाची सर्व संबंधीत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, विद्यार्थी, पालक व अन्य घटक यांनी नोंद घ्यावी.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे –४.